# प्रेसनोट

दिनांक ०४/१२/२०२४

## ॲन्टी करप्शन विभाग, नवी मुंबई यांची यशस्वी सापळा कारवाई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | विभाग/घटक | :- | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नवी मुंबई |
| २ | ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक . | :- | पेण पोलीस ठाणे, जि.रायगड,<br>ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक २५/२०२४,वेळ १७:५३, दिनांक ०४/१२/२०२४ |
| ३ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | श्री. दिनेश जनार्दन पाटील, वय ३५ वर्षे, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, पेण रा. शिर्कीगाव, ता. पेण, जि. रायगड |
| ४ | लाचेची मागणी रक्कम | :- | रु. १०,०००/- |
| ५ | स्विकारलेली रक्कम | :- | रु. १०,०००/- |
| ६ | थोडक्यात हकिगत | :- | यातील तक्रारदार व त्यांचे मित्र यांचे विरोधात पेण पोलीस ठाणे,रायगड येथे नोंद असलेल्या गुन्हयाचे दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल असुन सदर गुन्हयाचे अनुषंगाने तक्रारदार आणि त्यांचा मित्र यांनी संबंधीत न्यायालयामध्ये डिस्चार्ज ॲप्लीकेशन दाखल केला असता, सदर अर्जावर लोकसेवकाने "से" (म्हणणे) सादर केले असता त्यात मदत करणेकरीता, सीडीआर/एसडीआर व टॉवर लोकेशनचा अहवाल मिळण्यासाठी मा.न्यायालयात तक्रारदार यांनी केलेल्या अर्जात मदत करणेकरीता तसेच तक्रारदार व त्यांचे मित्राचे विरोधात ठोस युक्तीवाद न करणेकरीता लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे प्रत्येकी रू.५,०००/- या प्रमाणे एकुण रू. १०,०००/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असलेबात तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नवी मुंबई येथे दि.०३/१२/२०२४ रोजी समक्ष लेखी तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दि. ०३/१२/२०२४ रोजी शासकीय पंचासमक्ष केलेल्या लाचेच्या सत्यता पडताळणी दरम्यान यातील लोकसेवक दिनेश पाटील, विशेष सरकारी अभियोक्ता यांनी तक्रारदार यांचेकडे रू. १०,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निषन्न झाले.<br>त्यानुसार दि. ०४/१२/२०२४ रोजी सापळा कारवाई दरम्यान यातील लोकसेवक श्री.दिनेश जनार्दन पाटील, विशेष सरकारी अभियोक्ता यांना मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पेण येथील त्यांचे कार्यालयामध्ये मागणी केलेली रक्कम रू. १०,०००/- स्वीकारताना सापळा पथकाने त्यांना रंगेहात पकडले आहे. तरी लोकसेवक यांना ताब्यात घेवून त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्याची कारवाई सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

मार्गदर्शन अधिकारी:- मा.श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा.श्री.संजय गोविलकर,अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा.श्री.गजानन राठोड, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

संपर्क पत्ता :-ला.प्र.वि.नवी मुंबई मध्यवर्ती सुविधा इमारत फळमार्केट, तुर्भे, से.न.१९, एपीएमसी नवी मुंबई
ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१

संकेत स्थळ :-acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :-spacbthane@mahapolice.gov.in,
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :-acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :-१०६४ दुरध्वनी क्र. :-०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
असीबी, नवी मुंबई कार्यालय दुरध्वनी क. -२७८३३३४४/८३५६८२६४०३
व्हॉटस्ॲप क्र. :-९९३०९९७७००

(अरुंधती येळवे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

Scanned with OKEN Scanner